२४ वा सामना

Vs

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु वि. दिल्ली कॅपिटल्स्

वेळ : ७.३० वा. स्थळ : बंगळुरू

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड




www.surajyadigital.com । गुरुवार, दि. १० एप्रिल २०२५ । ▶ वर्ष : २३ वे ▶ अंक : १९१ वा ▶ किंमत : ५ रुपये ▶ पाने ८

# खतरनाकच!

## शक्तीपीठाला ड्रग्ज तस्करीचा कलंक

# तुळजाभवानीच्या मंदिरातील १३ पुजारी ड्रग्ज तस्करीत

▶▶ तुळजापूर-सोलापूरसह महाराष्ट्रात खळबळ, आरोपींची धरपकड

▶▶ मंदिर प्रशासनाने आरोपी पुजाऱ्यांची यादी मागवली पोलिसांकडून

✔ तुळजापूर-
सोलापूर/खास प्रतिनिधी

**महाराष्ट्राची आराध्य देवता, सात शक्तीपिठांपैकी एक शक्तीपीठ अशी ख्याती आणि ऐतिहासिक शहर म्हणून प्रसिद्ध असलेले तुळजापूर आता राज्यासह देशाच्या पटलावर चर्चेत आले आहे. या मोठ्या तीर्थक्षेत्राला ड्रग्ज तस्करीचा कलंक लागत आहे. अत्यंत धक्कादायक बाब म्हणजे येथील तुळजाभवानी मातेच्या मंदिरातील चक्क १३ पुजारी ड्रग्ज तस्करीत असल्याची माहिती समोर आली आहे. याने तुळजापूर-सोलापूरसह उभ्या महाराष्ट्रात खळबळ माजली आहे. येथील ड्रग्ज प्रकरणात बहुतांश पुजारी पेडलर असल्याची सूत्रांची माहिती आहे. विशेषत्वे, मंदिर समिती प्रशासनाने संबंधित आरोपी पुजाऱ्यांची यादी पोलिसांकडून मागवली आहे.**

तुळजापूरमध्ये गेल्या काही दिवसांपासून ड्रग्ज तस्करीची मोठी चर्चा आहे. या प्रकरणात गेल्या दोन महिन्यांपासून मोठ्या कारवाया होत आहेत. ड्रग्ज प्रकरणात काही दिवसांपूर्वी राजकीय कनेक्शनही समोर आले होते. त्यातूनही राजकीय वर्तुळात वेगळीच मोठी खळबळ उडाली आहे.

दरम्यान, पुजारी मंडळाने मात्र सरसकट पुजाऱ्यांची बदनामी थांबवण्याचे आवाहन केले आहे, कारण यातील आरोपी पुजारी देवीच्या दैनंदिन पूजेत सहभागी नव्हते. आतापर्यंत या प्रकरणात ३५ आरोपी निष्पन्न झाले असून, २१ आरोपी अजूनही फरार आहेत. यातील १३ आरोपी पुजारी असून मंदिरातील दररोजच्या पुज्याऱ्यांचा याच्याशी काही संबंध नसल्याची भूमिका पुजारी मंडळाने घेतलीय.

### थेट सोशल मीडियावर फोटो झळकावल्याने खळबळच खळबळ

दुसरीकडे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांचे कार्यकर्ते ड्रग्ज प्रकरणात आरोपी असल्याचा आरोप काँग्रेसच्या धीरज पाटील यांनी केला आहे. हा आरोप करताना धीरज पाटील यांनी आमदार राणाजगजितसिंह पाटील यांचे आणि आरोपीचे सोबतचे फोटो दाखवले आहेत. यासह भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांनीही सोशल मीडियावर खासदार ओमराजे निंबाळकर व आरोपीचे फोटो व्हायरल करत खासदार ओमराजे निंबाळकर यांच्यावर निशाणा साधलाय.



(संग्रहित छायाचित्र)

### काही लक्षवेधी नोंदी...

- ▶▶ तुळजापूरच्या ड्रग्ज तस्करीचा पुणे, मुंबईशी कनेक्शन असल्याबाबत बारकाईने तपास
- ▶▶ आतापर्यंत पोलिसांनी एकूण २५ आरोपींची नावं केली निश्चित
- ▶▶ १४ आरोपींना करण्यात आली अटक
- ▶▶ ११ फरार आरोपींचा शोध सुरु
- ▶▶ पुणे, मुंबईसह अन्य शहरात आरोपींचा कसून शोध

### ड्रग्ज तस्करीला राजकीय नेतेमंडळींच्या 'संशया'चा हात

तुळजापूर ड्रग्ज तस्करी प्रकरणाचं राजकीय कनेक्शन काही दिवसांपूर्वी समोर आले होते.तुळजापूर ड्रग्ज तस्करी प्रकरणातील आरोपी सोबतचे खासदार ओमराजे निंबाळकर यांचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले होते.तुळजापूर उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे कार्यकर्ते राहुल परमेश्वर व सुमित शिंदे तुळजापूर ड्रग्स तस्करी प्रकरणातील आरोपी असून दोन्ही आरोपी सोबत खासदार ओमराजे निंबाळकर यांचे फोटो समोर आले. यातील विश्वनाथ उर्फ पिंटू मुळे , भाजपशी संबंधित असून चंद्रकांत उर्फ बापू कने, तुळजापूरचे माजी नगराध्यक्ष, भाजपशी संबंधित , मात्र विधानसभा निवडणुकीत काँग्रेस उमेदवाराचा प्रचार केला होता.विनोद उर्फ पिंटू गंगणे, माजी नगराध्यक्षाचे पती, भाजपशी संबंधित असल्याचं समोर येत आहे.

### पोलीस महानिरीक्षक दोन दिवसांपासून तळ ठोकून

त्यामुळेच ही संगळी परिस्थिती पाहता छत्रपती संभाजीनगरचे विशेष पोलीस महानिरीक्षक विरेंद्र मिश्रा यांनी धाराशिव जिल्ह्यात येऊन तुळजापूर ड्रग्ज प्रकरणाचा आढावा घेतला आहे. दोन दिवसांपासून पोलीस महानिरीक्षक मिश्रा हे जिल्ह्यात तळ ठोकून आहेत. अशा स्थितीत श्री तुळजाभवानीचे तुळजापूर ड्रग्ज तस्करापासून कोण वाचवणार हा प्रश्न निर्माण झालाय.

## दुचाकीच्या डिकीतून रोकड पळवले

✔ **सोलापूर** : भरदिवसा एका वृद्ध इसमाच्या दुचाकीच्या डिकिमधून चोरट्याने दोन लाखाची रक्कम पळविल्याची घटना माढा येथील इंदिरा गांधी चौकात सोमवारी दुपारच्या सुमारास घडली. याप्रकरणी माढाच्या पोलिसांनी अनोळखी चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या संदर्भात गणेश गोरख काशीद (वय ६७, रा.अंजनगाव ता.माढा) यांनी पोलिसात फिर्याद दाखल केली.ते सोमवारी दुपारी दोनच्या सुमारास इंदिरा गांधी चौकातील गुरुकृपा ज्वेलर्स समोर दुचाकि लावून दुकानात गेले होते. त्यावेळी चोरट्याने त्यांच्या दुचाकिची डिकि उघडून त्यातील २ लाख रुपये रोख, बँकेचे चेक बुक आणि इतर कागदपत्रे चोरून नेली. असे त्यांच्या फिर्यादीत नमूद आहे. हवालदार शिंदे पुढील तपास करीत आहेत.

## पत्नीची हत्या करून पतीची आत्महत्या

### शेळगावमध्ये घडले दुहेरी मृत्यूकांड



✔ **बार्शी-वैराग** : अज्ञात कारणावरून पतीने पत्नीची हत्या करून स्वतः गळफास घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना बार्शी तालुक्यातील शेळगाव येथे घडली आहे.

याबाबत वैराग पोलीस स्टेशनमध्ये मयताच्या मुलाने दिलेल्या फिर्यादीनुसार सदर पित्यावर गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी कि वैराग सोलापूर रस्त्यावरील शेळगाव येथे सदर पती वसंत अंबादास पवार वय ५५ हा आपली पत्नी आईनाबाई उर्फ सोनाबाई वय ४५ तसेच दोन मुले अनुक्रमे राम वय ३१ व द्वितीय पुत्र संभाजी व त्यांच्या पत्नी अश्विनी व अंजना या सुना व नातवंडांसह राहत होते. तसेच त्यांच्यासोबत मयताचे पिता अंबादास पवार वय ८० हे देखील राहत होते. दिनांक आठ एप्रिल रोजी सायंकाळी वसंत पवार यांनी आपल्या पत्नीसोबत भांडण केले.

यावेळी तो मद्यधुंद अवस्थेत होता. मयत वसंत पवार याला दारूचे व्यसन होते. त्या सायंकाळी वसंत यांनी पत्नी सोनाबाईला लाकडी दांडक्याने मारहाण केली. या मारहाणी मध्ये तिच्या तोंडाला व डोक्याला मोठ्या जखमा होऊन ती रक्तस्त्रावाने मृत पावली. त्यानंतर पती वसंतने पत्नी सोनाबाईचे शव शेतातील घराजवळच्या चटईवर ठेवले व दि. ९ रोजी सकाळच्या सुमारास शेतातील बदामाच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली.

यावेळी दोन्ही मुले ही सोलापूर येथे एमआयडीसी कारखान्यात कामाला तसेच जाई जुईनगर सोलापूर येथील सासरवाडीत कामानिमित्त गेली होती त्यानंतर त्यांना कुटुंबीयांनी घडलेल्या प्रकाराची माहिती दिली. याबाबत मयताच्या मुलांनी राम पवार यांनी वैराग पोलीस स्टेशनमध्ये फिर्याद दिली आहे.

# बाप रे! अत्यंत भयानकच!! हादरले सोलापूरकर!!!

# तुरुंगातील कैदी नळाच्या खोदकामासाठी गर्दीच्या रस्त्यावर



**सोलापूर : येथील किडवाई चौकात नळ जोडणीसाठी खोदकाम करताना कैदी. यावेळी पोलीस आणि नागरिक.**

- ▶▶ सोलापूर शहर-जिल्ह्यात उडाली खळबळ
- ▶▶ दुपारी खोदकाम अन् सायंकाळनंतर खुलाशांचे सत्र
- ▶▶ तुरुंग प्रशासनास महापालिकेकडून कारणे दाखवा नोटीस
- ▶▶ कोण खरं अन् कोण खोटं याचा उशिरापर्यंत काथ्याकुट
- ▶▶ तुरुंग आणि महापालिका प्रशासनाकडून स्वत:ची बाजू सुरक्षित करण्याची मोठी धडपड



**सोलापूर : किडवाई चौकात पोलीस खोदकाम करताना कैदी.**

✔ सोलापूर/खास प्रतिनिधी

स्थळ : नेहमी मोठी गजबज असलेला सोलापुरातील किडवाई चौक परिसर...वेळ : बुधवार (ता.९) दुपारी दोन वाजण्याची...उन्हाचा पारा चढलेला असला तरी रस्त्यावरुन ये-जा करणाऱ्यांची मोठी वर्दळ...या गर्दीच्या ठिकाणी चौघेजण कैद्याच्या गणवेशात नळाचे खोदकाम करताना दिसत असलेले...या कैद्यांच्या शेजारी काही पोलीस अधिकारी आणि कर्मचारी उभे ठाकलेले...टिकाव, खोऱ्या, टोपली या साधनांच्या आधारे कैदी खड्ड्याचे काम करीत असलेले...यापूर्वी कधीही न पाहिलेले हे दृष्य पाहून या ठिकाणी प्रत्येक ये-जा करणारा थबकलेला...प्रत्यक्ष आपण नेमकं काय बघतोय? यावर विश्वासदेखील बसत नसलेला...कैदांना पाहून प्रत्येकजण आश्चर्यचकित झालेला...थोडसं बाजूला जाऊन प्रत्येकाची कुजबुज चाललेली...काहीजणांकडून मोबाईलच्या कॅमेऱ्यांचे फ्लॅश त्या धक्कादायक प्रकारावर पडत असलेले...मीडियाचे कॅमेरदेखील चित्रीकरणाची पुढे सरसावलेले...चक्क कैद्यांना रस्त्यावर आणण्याच्या धाडसाचे व्हिडीओ कैकांना तातडीने शेर झालेले...तद्नंतर सोलापूर शहरासह जिल्ह्याच्या ग्रामीण भागात चर्चेचं वादळ उठलेलं...कुतुहलानं प्रत्येकजण आपापल्या परीनं कैद्यासंबंधी जाणून घेण्याचा प्रयत्न करत असलेला...रात्री उशिरापर्यंत जिल्हा कारागृह प्रशासनाच्या 'अजब कारभाराची गजब गोष्ट' गुन्हेगारी, पोलीस, राजकीय आदी सर्वच क्षेत्रांच्या वर्तुळात रंगलेली...

सोलापुरातील किडवाई चौक परिसरातील जिल्हा कारागृहात ५५० कैदी आहेत. त्यांना पिण्यासाठी पुरेसे पाणी महापालिकेकडून उपलब्ध होत नाही. शिवाय पुरवठा होणारे पाणी दूषित आहे. स्वच्छ आणि नियमित पाणीपुरवठ्याअभावी तुरुंगातील कैद्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर, नव्याने नळ जोडणी घेण्यासाठी कैदी बाहेर काढले होते. त्यातून शहर जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली. या प्रकरणाला मोठे वेगळे वळण लागले. महापालिकेच्या आरोग्य अभियंता यांनी खुलासा केला आहे. जेलमध्ये पाणी साठवण क्षमता कमी आहे. नव्याने टाकी बनवल्यास नवीन लाईन देता येईल. तसे जेल प्रशासनास आधीच कळविले आहे. दरम्यान कैद्यांकडून सुरु असलेले खोदकाम अर्ध्यावरच ठेवण्यात आले. नळजोडणी झाली नसल्याचे तुरुंग अधीक्षकांकडून सांगण्यात आले.

### तुरुंग अधीक्षक कुंभार यांचे मुद्दे

▶ तुरुंगातील ५५० कैद्यांना दूषित पाण्यातून मोठा धोका निर्माण झाला, त्यामुळे कैद्यांच्या आरोग्याचा विचार करता नवीन नळाची गरज ▶ नळ खोदकामासाठी काढलेले कैदी हे रेग्यूलरचे होते, चांगल्या चारित्र्याचे होते, पळून जाणाऱ्यांपैकी नव्हते. ▶ नळजोडणीसंबंधी खोदकामाची जबाबदारी तुरुंग प्रशासनानेच घ्यावी, असे महापालिकेने सांगितल्याने खोदकामासाठी कैदी काढले बाहेर ▶ तुरुंगामध्ये कैद्यांशिवाय अन्य कर्मचारी कामांसाठी नाहीत, त्यामुळे कैद्यांकडून काम करुन घेणेच क्रमप्राप्त होते. ▶ कैदी बाहेर काढणे ही तुरुंगासंबंधीची रेग्यूलर बाब आहे, त्यामुळे वेगळे वाटण्याचे कारण नाही. ▶ तुरुंगामधील स्वच्छतेसह अन्य कामे हे कैदीच करतात, इतर कर्मचारी नियुक्त नाहीतच. ▶ तुरुंग परिसरातील स्वच्छेतसाठी दररोज कैदी बाहेर काढले जातात, नळजोडणीचे काम तुरूंगाजवळच होते म्हणून कैद्यांना नेले. ▶ कैद्यांना बाहेर काढण्याची सगळी रितसर प्रक्रिया पूर्ण केली होती. ▶ काम करण्यास इच्छुक असल्याचा कैद्यांचा विनंती अर्ज प्रशासनाकडे आहे. ▶ नळजोडणीच्या खोदकामाचे साधारण ६५ ते ६७ रुपये वेतन कैद्यांना देण्यात येईल. ▶ कुख्यात कैदी अशा कामांसाठी बाहेर काढून धोका पत्करला जात नाही. ▶ खोदकाम करताना महापालिकेचे संबंधित अधिकारी उपस्थित होते. ▶ ५५० कैद्यांच्या पिण्याचा पाण्याचा प्रश्न गहन बनल्याने, शिवाय नळ जोडणीसाठी दुसरा पर्यायच नसल्याने कैद्यांना काढले बाहेर. ▶ नळ जोडणी शुल्क महापालिकेकडे भरले आहे. ▶ मा.न्यायलयाकडे पाण्यासंबंधी तक्रारी झाल्यात आहेत, न्यायालयाने पाणीपुरवठ्याची सोय करण्याचे निर्देश दिलेत. ▶ महापालिका आयुक्तांची नोटीस मिळाली. समक्ष भेटण्यासह लेखी उत्तर देणार येईल.

### महापालिका आयुक्तांच्या कारणे दाखवा नोटीसमधील मुद्दे

- ✔ महापालिकेचे संबंधित विभागाचे अधिकारी नळ खोदाई ठिकाणी प्रत्यक्ष नसताना अनधिकृतपणे नळी जोडणी घेण्याचा प्रकार
- ✔ नळ जोडणीसंबंधी महापालिकेच्या संबंधित विभागास माहिती न देता परस्पर खोदाई
- ✔ जिल्हा कारागृह प्रशासनाने नळ जोडणीचे महापालिकेला अद्याप नाही भरले शुल्क
- ✔ कारागृह अधिकारी येवून भेटले होते, पण शुल्क न भरताच निघून गेले
- ✔ शुल्क न भरता पाणीपुरवठ्यासाठी दोन इंची लाईन देण्याची केली होती मागणी

### खोदकामासाठी काढलेले कैदी हे रेग्यूलरचे आणि प्रामाणिक

नळजोडणीच्या कामासाठी बाहेर काढलेले चौघे कैदी हे गंभीर गुन्ह्यामधील नव्हतेच. शिवाय शिक्षा लागलेले कैदी नव्हते, रेग्यूलर कैदी होती. परिस्थिती गरीब असल्याने कामाची गरज असलेले आणि त्यासाठी तुरुंग प्रशासनाकडे विनंती केलेले ते होते. तुरुंगात प्रामाणिकपणे काम करणारे उत्तम चारित्र्याचे संबंधित कैदी होते, त्यामुळे ते पळून जाण्याची कसलीच रिस्क नव्हती, असे जिल्हा कारागृह प्रशासनाच्या सूत्रांनी सांगितले.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




तुझं क्रिकेट बास कर, दोन वेळेस आंघोळ शक्य नाही!

संगम श्री डे
277-64-239

संगम श्री नाईट
337-32-156

कल्याण
789-44-239

मुंबई
258-50-145